# योग शांततेचा मार्ग दाखवू शकतो

## विशाखापट्टणममधून पंतप्रधान मोदींचा संदेश

**विशाखापट्टणम–** आज संपूर्ण जग तणाव आणि अशांततेतून जात आहे. अनेक देशात अस्थिरता वाढत आहे. अशा परिस्थितीत योग आपल्याला शांततेचा मार्ग दाखवू शकतो. योग हे असे बटण आहे, जे मानवाला श्वास घेण्यासाठी, संतुलन राखण्यासाठी आणि पुन्हा नव्या दमाने पुढे जाण्यासाठी क्षणभर विश्रांती प्राप्त करून देतो, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

पंतप्रधान मोदी योग दिनानिमित्त आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथील रामकृष्ण बीचवर आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहिले आहेत. यावेळी मोदींनी ३ लाखांहून अधिक लोकांसोबत येथे योगा केला. सोबतच योगाचे महत्व सांगितले. जनतेला संबोधित करताना नरेंद्र मोदी यांनी योगाला एक जनआंदोलन बनवू या. या आंदोलनात प्रत्येक व्यक्ती दिवसाची सुरुवात योगाने करेल. या आंदोलनात सर्व समाज योगामुळे एकत्र येईल. योग मानवतेला एका सुत्रात आणेल, असे आवाहन केले.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, गेल्या दशकातील योगाच्या प्रवासाकडे पाहताना मला अनेक गोष्टी आठवतात. ज्या दिवशी भारताने संयुक्त राष्ट्रांमध्ये २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून ओळखला जावा, असा प्रस्ताव मांडला होता. त्यावेळी जगभरातील १७३ देशांनी आपणास पाठिंबा दिला. आजच्या जगात असा पाठिंबा मिळणे ही सामान्य गोष्ट नाही. हा केवळ एका प्रस्तावाला पाठिंबा नव्हता, तर तो मानवतेच्या भल्यासाठी जगाचा सामूहिक प्रयत्न होता. आता ११ वर्षांनंतर आपण पाहतो की योग जगभरातील लाखो लोकांच्या जीवनशैलीचा एक भाग बनला आहे.

# माऊलींची पालखी आज दिवेघाट मार्गावर

## माऊली-तुकोबांच्या पादुकांवर भाविकांनी टेकवला माथा

**पुणे (प्रतिनिधी)–** माऊलींची पालखी रविवारी सासवडच्या दिशेने रवाना होणार आहे. दिवे घाटाचा अवघड टप्पा याच मार्गावर असून, २८ किमीचा हा टप्पा वारकरी हरिनामाच्या बळावर लीलया पार करतात. त्यामुळे यंदाही वारकऱ्यांना ओढ लागली आहे, ती दिवे घाटाची सहवासाची. दिवे घाटही माउलींच्या स्वागतासाठी आतुर असेल. तर संत तुकाराम महाराजांची पालखी लोणी काळभोरच्या दिशेने मार्गस्थ होणार आहे.



संत ज्ञानेश्वर माउली व संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे शुक्रवारी शहरात आगमन झाले अन् पुणेकरांनी आपली सेवा रुजू केली. सकाळपासूनच हजारो भाविकांची पावले दर्शनासाठी पालखी विठोबा मंदिर व निवडुंगा विठोबा मंदिराच्या दिशेने वळली होती. लांबच लांब रांगा लावत व माउली-तुकोबांच्या पादुकांवर आपला माथा टेकवत पुणेकर भाविकांनी दर्शनाचा आनंद घेतला. निवांतपणाबरोबरच वारकरी बांधवांनी भक्तीचा जागरही घडविला. शहरातील मठ, मंदिरे, मोकळ्या जागा सर्वत्रच हा सावळा, सुंदर विठ्ठल भरून राहिलेला. भजन, कीर्तनात, भक्तिरसात पुण्यनगरी न्हाऊन गेली. दरम्यान, दिवेघाटात रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू असल्याने अपघाताचा धोका लक्षात घेऊन डोंगरमाथ्यावर भाविकांना प्रवेश बंदी घालण्यात आली आहे. मध्यंतरी मुसळधार पावसामुळे दिवेघाटात पाण्याचे प्रचंड लोंढे व त्यासोबत मातीही वाहून आल्याचे पहायला मिळाले होते. हे लक्षात घेऊन खबरदारी म्हणून माथ्यावर जाण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून पादुकांचं दर्शन**

आषाढी पालखी सोहळ्यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी रात्री पुणे इथल्या भवानी पेठेतील पालखी विठ्ठल मंदिरात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पादुकांचं दर्शन घेतलं. यावेळी त्यांच्या हस्ते मंदिरात पालखीची पूजा झाली.

# भारताचा डाव दुसऱ्या दिवशी कोसळला

## यशस्वी पाठोपाठ कर्णधार शुभमन व पंतने झळकावले शतक

**हेडिंग्ले–** इंग्लंडविरुद्ध लीड्स येथे खेळल्या जाणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात टीम इंडियाने ४७१ धावा केल्या आहेत. भारताकडून यशस्वी जैस्वाल (१०१), शुभमन गिल (१४७) आणि ऋषभ पंत (१३४) यांनी शानदार शतके झळकावली. दुसऱ्या दिवशी इंग्लंडच्या गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली. कर्णधार बेन स्टोक्स आणि जोश टँग यांनी सर्वाधिक ४-४ विकेट घेतले. दुसऱ्या दिवशी इंग्लंडच्या गोलंदाजांनी भारतीय फलंदाजीवर पूर्णपणे वर्चस्व गाजवल. टीम इंडियाने शेवटचे ७ बळी अवघ्या ४१ धावांत गमावले.

दुसऱ्या दिवशी भारतीय संघाने ३ बाद ३५९ धावसंख्येवरून खेळायला सुरूवात केला. ऋषभ पंतने दमदार शैलीत फलंदाजी करताना आपले शतक पूर्ण केले. त्याच वेळी शुभमन गिल १५० धावा काढण्यापासून हुकला, त्याला १४७ धावांवर शोएब बशीरने आऊट केले. त्याच वेळी पंतने १३४ धावांची खेळी खेळली. त्यानंतर, क्रिजवर आलेल्या ६ फलंदाजांपैकी फक्त एकच खेळाडू धावांच्या बाबतीत दुहेरी आकडा गाठू शकला. भारतीय संघाने एकवेळ ३ बळी गमावून ४३० धावा केल्या होत्या. टीम इंडियाने उर्वरित ७ विकेट अवघ्या ४१ धावांत गमावल्या.

## अकोले नगरपंचायतमध्ये योग दिन साजरा

**अकोले (प्रतिनिधी)–** येथील नगरपंचायतीकडून आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने येथील योगा भवनमध्ये योग दिन साजरा करण्यात आला. नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, उपनगराध्यक्ष नगराध्यक्ष शरद नवले, रोटरी क्लबचे संस्थापक अध्यक्ष अमोल वैद्य, नगरसेवक नवनाथ शेटे, प्रमोद मंडलिक, विजय पवार, मुख्याधिकारी धनश्री पवार, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यानिमित्ताने योग शिक्षिका अश्विनी काळे यांनी योग शिक्षणाचे धडे दिले.



## निलकंठ क्षीरसागर यांचे निधन



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** येथील हॉटेल निलकंठचे मालक निलकंठ मुरलीधर क्षीरसागर (वय ५२) यांचे काल पुणे येथील सह्याद्री हॉस्पिटल येथे हृदयविकाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, मुलगा, बहिणी, सून, पुतणे असा परिवार आहे. बुवा हलवाई हॉटेलचे मालक दत्तात्रय क्षीरसागर यांचे ते धाकटे बंधू तर कुणाल क्षीरसागर यांचे वडील होत. कै. निलकंठ क्षीरसागर यांची अंत्ययात्रा आज रविवार दि. २२ जून रोजी सकाळी १० वाजता संगमनेर रोड, श्रीरामपूर येथील निवासस्थानापासून निघणार आहे.

# सरकारने कबीर कला मंचला रोखलं पाहिजे

## वारीत नक्षलवादाचे आरोप असलेले लोकं- ह. भ. प. बंडातात्या कराडकर

**पुणे–** पंढरपूरच्या वारीत नक्षलवादाचे आरोप असलेले लोक पाहायला मिळत आहेत. ते बुद्धिभेद करत आहेत. सरकारने लवकर यांच्यावर कारवाई करावी, अन्यथा वारकरी संप्रदायातील युवक जाब विचारतील. त्यासाठी आम्ही युवक गट तयार केला आहे. त्यावेळी सरकार जबाबदार राहील, असा इशारा हभप बंडातात्या कराडकर यांनी दिला आहे.

समस्त वारकरी संस्था आणि संस्थान यांच्यावतीने शनिवारी (दि.२१) घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी हभप कराडकर म्हणाले, कबीर कला मंच यांना सरकारने रोखले पाहिजे, वारीत अंधश्रद्धा निर्मूलन समिती काय काम करत आहे? असा सवालही त्यांनी केला. काही पुरोगामी संघटना पालखी सोहळ्यात येतात आणि अपप्रचार करतात. संताचे दाखले अर्धवट दिले जात आहे. त्यामुळे वारकरी संप्रदायाला बदनाम करण्याचे काम सुरु आहे. वारकरी संप्रदाय सगळ्यात मोठा आहे. त्यांची संघशक्ती मोठी आहे. वाघाचे कातडी पाखरून वाघ होता येत नाही. पण असेच काहीजण काम करत आहेत. काहीजण वारकरी गर्दीचा फायदा घेऊन आपले खोट नाणे चालवत आहेत. आम्ही कुणाचा द्वेष करत नाहीत. पण मुळावर घाव घालत असाल तर हे लोकांना सांगितले पाहिजे, असे बंडातात्या कराडकर यांनी म्हटले आहे.

**पंढरपूरला जाईपर्यंत आमच्या मागण्या मान्य करा**

मोशीत कत्तलखाना होणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. पण त्याची लेखी सूचना निघाली पाहिजे. आमची सरकारला मागणी आहे की, आम्ही पंढरपूरला जाईपर्यंत आमच्या मागण्या मान्य करून लेखी सूचना द्याव्यात. अन्यथा वारकरी संप्रदायाच्या भावना तीव्र झाल्यास आंदोलन होईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

# पान १ वरुन

## कर्जमाफीचा निर्णय उचित वेळी

आले आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, योग ही आपली परंपरा, संस्कृती आहे. आनंददायी जीवनाची ही गुरुकिल्ली आहे. योग ही भारतीय चिकित्सा पद्धती आहे. शरीरासोबत मनालाही उभारी देण्याचे काम योगसनाच्या माध्यमातून होते. शरीराची रचना लक्षात घेऊन नखापासून केसापर्यंत आंतर्बाह्य अवयवांचा उपचार योगातून केला जातो. यंदाच्या जागतिक योग दिनाची संकल्पना वन अर्थ, वन हेल्थ हा संदेश आपली वारकरी परंपरा प्रत्यक्षात जगते. पुण्याने आता वारीला नवीन रिंगण दिलेले आहे. आरोग्यदायी, स्वस्थ समाज निर्माण करण्याचा प्रयत्न सर्वांनी मिळून करू,फ अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

## विश्रांतीनंतर पुन्हा धोधो पाऊस

आहेत. पालघर, नाशिक आणि पुण्याच्या घाट भागात पावसाचे प्रमाण अधिक आहे. पश्चिम महाराष्ट्रात इंद्रायणी आणि इतर काही नद्याही पूरग्रस्त आहेत. नाशिकमध्ये, पाणलोट क्षेत्रात मुसळधार पावसामुळे गोदावरी नदी दुथडी भरून वाहत आहे. दरम्यान पावसाच्या पुढील अंदाजात हवामान विभागाने म्हटले आहे, २२-२४ जून दरम्यान उपहिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीम, २२ आणि २५ जून रोजी गंगीय पश्चिम बंगाल, २०-२३ जूनदरम्यान बिहार, २२ जूनपर्यंत झारखंड आणि ओडिशा, २५ जूनपर्यंत मध्य प्रदेश, २० जूनपर्यंत झारखंड, २१ जून रोजी पूर्वमध्य प्रदेश, २४ आणि २५ जून रोजी मध्यप्रदेश आणि २० जून रोजी छत्तीसगडमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. २५ जूनपर्यंत कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## भंडारदरा आज ४५ टक्के भरणार

झाला होता. रात्री पावसाचा जोर काहीसा वाढल्याने धरणात नवीन पाण्याची आवक वाढली आहे. पाऊस आणि येणारी पाण्याची आवक लक्षात घेता या धरणातील पाणीसाठा रविवारी रात्री उशीरापर्यंत ४५ टक्क्यांच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. निळवंडेतील पाणीसाठा ३०३४ दलघफू (३६.४३टक्के) झाला होता. पावसाबरोबर धुकेही वाढले आहे. कळसूबाई शिखर व कोकणकडा धुक्यात हरवल्याचे पाहायला मिळत आहे. शनिवार व रविवार सुट्टी आल्याने पर्यटकांची गर्दी आहे. मात्र, खबरदारीचा उपाय म्हणून वन विभागाने हरिश्चंद्रगड व रतनगडावर पर्यटकांना प्रवेश बंदी केली आहे. त्यामुळे पर्यटकांचा हिरमोड झाला.

### आढळात ७२ टक्के पाणीसाठा

- वीरगाव वार्ताहराने दिलेल्या वृत्तानुसार, आढळा पाणलोटात पाऊस सुरूच असल्याने आढळा धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढु लागला आहे. काल सायंकाळी १०६० दलघफू क्षमतेच्या या धरणातील पाणीसाठा ७५८ दलघफू झाला होता. गत वर्षीच्या तुलनेत यंदा या धरणात अधिक पाणीसाठा आहे. पावसाचे प्रमाण टिकून राहिल्यास हे धरण येत्या काही दिवसांत ओव्हरफ्लो होण्याची शक्यता आहे.

## मुळातील साठा १०५०० दलघफूवर

क्युसेकसवर आला. शनिवारी सकाळी मुळा नदीत १७५३ क्युसेक विसर्ग होता. सायंकाळी हा विसर्ग १६३३ दलघफू होता. पाणलोटात कमी अधिक पाऊस होत असल्याने धरणात येणारी आवकही कमी अधिक होत आहे. अधून मधून पावसाच्या जोरदार सरी कासेळत आहे.

## गोदावरीत ११०७९ क्युसेकने विसर्ग

पाण्याची आवक सुरुच आहे. काल सकाळी मागील २४ तासांत दारणात ३५६ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली. दारणा ६१.३५ टक्के भरले असून यातून ४७४२ क्युसेकने विसर्ग सुरु आहे. काल सकाळपर्यंत या धरणातून अर्धा टीएमसीहुन अधिक पाण्याचा विसर्ग दारणा नदीत केला जात आहे. दारणातील पाणी गोदावरीवरील नांदूरमधमेश्वर बंधाऱ्यात सामावत आहे. गंगापूर धरणात १२२ दलघफू नवीन पाण्याची आवक २४ तासात झाली. काल अखेरपर्यंत या धरणात एकूण १.३ टीएमसी नवीन पाणी दाखल झाले. अन्य धरणातही कमी अधिक प्रमाणात नवीन पाणी दाखल होत आहे. गंगापूर मधून काल सायंकाळी ३९४४ क्युसेकने पाण्याचा विसर्ग करण्यात येत होता. कडवातून ७९५ क्युसेकने विसर्ग सुरु आहे.

खाली नांदूरमधमेश्वर बंधाऱ्यात दारणा, गंगापूर, व कडवातून विसर्ग दाखल होत आहे. तसेच नांदुरमधमेश्वर बंधाऱ्याच्या पाणलोटातील पावसाचे पाणी दाखल होत असल्याने या बंधाऱ्यातून गोदावरीत जायकवाडीच्या दिशेने काल सायंकाळी ११०७९ क्युसेकने विसर्ग करण्यात येत होता. काल सकाळपर्यंत जायकवाडीच्या दिशेने या बंधाऱ्यातून गोदावरीत २.५ टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला.

## नाशिकमधून जायकवाडीत...

दारणा धरणातून ४,७४२ क्यूसेक, तर नांदूरमध्यमेश्वर धरणातून शनिवारी ९,४६५ क्यूसेक पाणी सोडण्यात आले आहे. याशिवाय कादवातून ५३० क्युसेक, तर पालखेड धरणातून १,३५० क्युसेक वेगाने पाणी सोडले जात आहे. नाशिक जिल्ह्यातील धरणांतून पाणी सोडण्यात आल्यामुळे मराठवाड्यातील जायकवाडी धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू झाली आहे. हे पाणी नांदूरमध्यमेश्वर मार्गे नाथसागरात दाखल होत आहे. या धरणाच्या पाणलोट क्षेत्रासह नाशिक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यामुळे गोदावरीला पूर आला आहे. हे पाणीही जायकवाडीच्या दिशेने झेपावले आहे. त्यामुळे पाण्याची आवक आणखी वाढण्याची शक्यता आहे. सध्या जायकवाडी धरणात ३१.९३ टक्के पाणीसाठा आहे. एका दिवसात दीड टक्के पाणीसाठा वाढला आहे.

## झेडपी पुन्हा सरेंडर करणार ३४ कोटी!

करण्यात येतो. हा निधी मंजूर करतांना विकास कामांची संख्या याचा कच्चा आराखडा निश्चित करून त्यानूसार निधीची मागणी आणि उपलब्धता होत असतांना दरवर्षी जिल्हा परिषदेचा कोट्यावधी रुपयांचा निधी अखर्चित राहतो कसा असा प्रश्न उपस्थित होत आहे. सरकारच्यावतीने मंजूर करण्यात येणारा निधीच्या खर्चाचे नियोजन करण्यासाठी जिल्हा परिषदेत अधिकारी दर महिन्यांला खर्च आढावा बैठक घेतात. या बैठकांनंतर ३१ मार्च संपल्यानंतर देखील सुमारे महिनाभर शासन ऑफलाईन पध्दतीने निधी खर्च करण्यास मान्यता देते. यानंतर देखील कोट्यावधी रुपयांचा निधी अखर्चित राहत असल्याने आता सरकारने निधी अखर्चित करणाऱ्या विभागांवर जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आली आहे.

जिल्हा परिषदेला २०२३-२४ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेत ३३९ कोटी २९ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. या निधीतून ३१ मार्च २०२५ अखेर ३१८ कोटी १३ लाखांचा निधी खर्च झालेला आहे. दोन वर्षात जिल्हा परिषदेच्या ११ विभागांनी ३४ कोटी १४ लाख रुपयांचा निधी खर्च केलेला नाही. यामुळे यंदा देखील हा शासनाला परत करण्याची नामुष्की जिल्हा परिषद प्रशासनावर ओढावली आहे. हा १०० खर्च व्हावा, यासाठी जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी दर महिन्याला आढावा बैठकी घेतल्या. विभाग प्रमुखांना सक्त सुचना देत निधी खर्च करण्यास सांगितले. मात्र, त्याचा उपयोग झाला नसल्याचे आता दिसून येत असून यामुळे यंदा देखील कोट्यावधी रुपयांचा निधी शासन जमा होणार आहे. गेल्या काही वर्षात जिल्हा परिषदेत मंजूर निधी अखर्चित राहण्याची परंपरा सुरू झाली असून ती खंड होतांना दिसत नाही.

### विभागनिहाय अखर्चित निधी

- शिक्षण विभाग ९ कोटी ७८ लाख, आरोग्य ७ कोटी २४ लाख, महिला बालकल्याण विभाग २ कोटी १४ लाख, कृषी ३७ लाख, लघू पाटबंधारे ९४ लाख, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग २२ लाख, सार्वजनिक बांधकाम विभाग दक्षिण ५ कोटी ६८ लाख, सार्वजनिक बांधकाम विभाग उत्तर ३ कोटी ३५ लाख, पशूसंवर्धन ६४ लाख, समाज कल्याण २ कोटी ४० लाख, ग्रामपंचायत १ कोटी ४३ लाख असे ३४ कोटी १४ लाखांचा निधी अखर्चित आहे.

## पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न...

ट्विटमध्ये म्हटले, मतदार यादी? मशीन-रीडेबल स्वरूपात दिली जाणार नाही. सीसीटीव्ही फुटेज? कायदा बदलून लपवले. निवडणुकीचे फोटो आणि व्हिडिओ? आता ते १ वर्षात नाही तर ४५ दिवसांत नष्ट केले जातील. ज्याला उत्तर हवे होते, तो पुरावे नष्ट करत आहेत. त्यामुळे स्पष्टपणे दिसून येते, मॅच फिक्स आहे आणि फिक्स्ड निवडणूक लोकशाहीसाठी विष आहे.

**रेकॉर्डिंग फक्त ४५ दिवस सुरक्षित**

दरम्यान, आता निवडणुकीदरम्यान घेतलेले फोटो, सीसीटीव्ही फुटेज, वेबकास्टिंग आणि व्हिडिओ रेकॉर्डिंग फक्त ४५ दिवसांसाठी सुरक्षित ठेवले जातील. त्यानंतर सर्व डेटा डिलीट केला जाईल. निवडणूक आयोगाने ३० मे रोजी सर्व राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. जर कोणत्याही मतदारसंघातील निवडणूक निकालाला न्यायालयात आव्हान दिले गेले नाही, तर ४५ दिवसांनी हा सर्व डेटा नष्ट करावा. त्यावर काँग्रेसने आयोगाच्या या नियमाला विरोध केला आहे. पक्षाने म्हटले आहे की यापूर्वी हा डेटा एक वर्षासाठी सुरक्षित ठेवण्यात आला होता, जेणेकरून लोकशाही व्यवस्थेत कधीही त्याची चौकशी करता येईल. आयोगाचा हा नियम पूर्णपणे लोकशाहीविरुद्ध आहे. तो तत्काळ मागे घ्यावा, असे काँग्रेसकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### यापूर्वीही नियम बदलले

- २० डिसेंबर २०२४ रोजी केंद्र सरकारने मतदान केंद्राचे सीसीटीव्ही, वेबकास्टिंग फुटेज आणि उमेदवारांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग यासारख्या काही इलेक्ट्रॉनिक कागदपत्रांचे सार्वजनिकरित्या उघड करण्यापासून रोखण्यासाठी निवडणूक नियमांमध्ये बदल केले. तथापि, काँग्रेसने निवडणुकीशी संबंधित इलेक्ट्रॉनिक कागदपत्रे सार्वजनिकरित्या उघड करण्यास मनाई करणाऱ्या नियमाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

## राज्यातील ३० वैद्यकीय...

अभ्यासक्रमांच्या जागांचे वार्षिक नूतनीकरण करण्याची प्रक्रिया राबवित येते. या मूल्यांकन प्रक्रियेमध्ये वैद्यकीय महाविद्यालयांनी सादर केलेले स्व-घोषणापत्र, आधार सक्षम बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीमधील प्राध्यापकांच्या उपस्थितीचा डेटा, वैद्यकीय मापदंड आणि पायाभूत सुविधा यांची तपासणी करण्यात आली. या मूल्यांकनानंतर राज्यातील तब्बल ३० वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची अपुरी संख्या, वैद्यकीय सोयी-सुविधा आणि पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे वैद्यकीय महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली. नोटीसीवर वैद्यकीय महाविद्यालयांनी सादर केलेल्या अहवालाची तपासणी केल्यानंतर उत्तर असमाधानकार असल्याचे आढळून आले. तसेच सातत्याने या त्रुटी अढळत असून, त्या दूर करण्यासाठी संस्थांकडून कोणतेही प्रयत्न करण्यात आले नसल्याचेही निदर्शनास आले आहे. या वैद्यकीय महाविद्यालयांमधील सुविधांबाबत मूल्यांकनामध्ये प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आल्याने अखेर राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयागाने राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव आणि डीएमईआरच्या संचालकांनाच थेट उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत.

## अपंग, घटस्फोटीत, परित्यक्त...

प्रमाणपत्राबाबत साशंकता आहे, अशा सर्व शिक्षकांची जिल्हा शल्यचिकित्सकांच्या मार्फत पुन्हा तपासणी करण्यात यावी. संबंधितांच्या अपंग प्रमाणपत्राची ऑनलाइन यूडी-आयडी प्रमाणपत्राची तपासणी नेमण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीमार्फत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

त्यानुसार आता गटशिक्षणाधिकारी प्रत्येक तालुक्यात विशेष संवर्ग-१ मधून बदलीसाठी अर्ज करणार्या, तसेच घटस्फोटीत-परित्यक्त शिक्षकांच्या न्यायालयाने मंजूर केलेल्या घटस्फोटाच्या प्रमाणपत्राची प्रत, शिक्षिकेने ती पतीसोबत राहत नसल्याचे सादर केलेले स्वयंघोषणापत्र, त्यांच्या रहिवासी दाखले, आधार कार्ड, शिधापत्रिका आदीची पडताळणी करण्यासोबत त्या राहत असलेल्या ठिकाणी समक्ष भेटी देऊन पाहणी करणार आहेत. यामुळे जिल्ह्यातील शिक्षकांच्या पोटात गोळा आला आहे.

### 'अपडाऊन' तपासणीची गरज

- नगर शहरात राहून अथवा तालुक्याच्या ठिकाणी राहून खेडेगावात अपडाऊन करणाऱ्या शिक्षकांची तपासणी करण्याची मागणी आता पालकांमधून होत आहे. एकट्या नगर जिल्ह्यात कार्यरत असणाऱ्या ११ हजार शिक्षकांपैकी किती शिक्षक त्यांच्या नेमणुकीच्या गावात राहात आहेत. त्यांनी नेमणुकीच्या ठिकाणी राहत असलेले दाखले खरे की खोटे याची तपासणी करण्याची गरज निर्माण झाली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी शिक्षकांच्या नेमणुकीच्या ठिकाणी चौकशी करून यात फसवणूक करणाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे.

## सिंधू करार आता कायमचा स्थगित

होता आणि आम्ही तेच केले. हा करार भारत आणि पाकिस्तान यांच्या शांतीच्या आणि प्रगतीच्या दृष्टीने करण्यात आला होता. मात्र, याच्या अटीच मोडल्या गेल्या, यामुळे याचे औचित्य संपले. गेल्या २२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मिरातील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली. या हल्ल्यात २६ पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला होता. यामुळे भारतात प्रचंड संतापाची आणि दुःखाची लाट होती. त्यानंतर लगेचच भारताने सिंधू पाणी करार तात्काळ प्रभावाने स्थगित केला आणि पाकिस्तानी नागरिकांना देशाबाहेर काढण्यासारखे अनेक राजकीय निर्णयही घेतले होते, असे शहा यावेळी म्हणाले.

## नऊ लाख विद्यार्थी, पालक...

विविध योग संघटनांच्या संयुक्त विद्यमाने नगरच्या वाडिया पार्क येथे उत्साहवर्धक वातावरणात योग दिन साजरा झाला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बाळासाहेब बुगे, जिल्हा आरोग्य अधिकारी बापुसाहेब नागरगोजे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्यासह विविध विभाग प्रमुख उपस्थित होते. सर्वप्रथम जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून योग दिनाची सुरुवात करण्यात आली. योग दिनाचे महत्व स्पष्ट करून योग दिनाच्या शुभेच्छाही त्यांनी यावेळी दिल्या. या कार्यक्रमात शहरातील विविध खेळ संघटना, पोलिस ॲकॅडमी प्रशिक्षणार्थी, खेळाडू, नागरिक आणि योगसाधक सहभागी झाले होते. आर्ट ऑफ लिव्हिंग, पतंजली योग संस्था, योग विद्याधाम, एमएमवायटीसी, योग संघटना यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व खेळाडू, नागरिक आणि मान्यवरांनी योग प्रार्थना, आसने, प्राणायाम, ध्यान धारणा करून व योग संकल्पद्वारे योग दिन साजरा केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, श्रीमती प्रियंका खिंडरे, क्रीडा मार्गदर्शक संतोष वाबळे, प्रविण कोंढावळे, विशाल गर्जे, मनिष राठोड, अविनाश काळे, शैलेश गवळी, मल्हार कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.